| | | |
| --- | --- | --- |
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार**<br>**पोलीस आयुक्त यांचे कार्यालय**<br>रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे<br>फोन नं ०२२- २९४५१००१<br>**Email ID –**<br>**pro.cp.mbvv@mahapolice.gov.in** | |

प्रेसनोट क्रमांक ३५३ दिनांक २१-१२-२०२१

## आमदार श्रीमती गीता जैन यांचे नावाने तोतयेगिरी करुन पैसे मागणाऱ्या तीन जणांना काशिमिरा पोलीस स्टेशनकडुन अटक.

दिनांक २०/१२/२०२१ रोजी दोन पुरुष व एक महिला अशांनी कट रचुन एका अज्ञात आरोपीताने श्री. आमिर तलहा मुखी या हॉटेल व्यावसायीकास फोन करुन आमदार गीता जैन यांचा पी. ए. अमन शेलार बोलत असुन आमदार गीता जैन आपल्याशी बोलणार आहेत असे सांगुन अज्ञात महिलेने आमदार गीता जैन बोलत असल्याची तोतयेगिरी करुन "हमारे समाज में हम विध्द्रावा महिलायोके शादी का प्रोग्राम रखा है, तो उसके लिए हमे आपसे डोनेशन चाहीए" असे सांगुन पैशाची मागणी करुन हॉटेल व्यावसायीकाकडे पैसे घेण्यास अमितकुमार बद्राकांतभाई पारेख वय ५४ वर्ष यास पाठवुन देवुन फसवणुक करण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी हॉटेल व्यावसायीक आमिर तलहा मुखी यांना संशय आल्याने त्यांनी पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीवरुन काशिमीरा पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद क्रमांक । ८७६/२०२१ भादंवि कलम १२०(ब), १७०, ४१९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयात आरोपी (१) अमितकुमार बद्राकांतभाई पारेख, वय ५४ वर्ष, रा. डी-२/७६, श्रध्दा सोसायटी, गोराई-१, मुंबई, मुळ राहणार जुनागढ, गुजरात याचेकडे सखोल तपास करुन आरोपी नंबर (२) सिध्देश सुधाकर सावंत ऊर्फ अमन शेलार, वय ४२ वर्ष, रा. ६०२, मानवी पॅराडाईस, नारायणा स्कुल, भाईंदर पश्चिम व (३) महिला आरोपी यांना निष्पन्न करुन त्यांना गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीतांना मा. न्यायालयातकडुन दिनांक २४/१२/२०२१ पर्यंत पोलीस कोठडी मंजुर आहे.

सदरची कारवाई श्री. अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, श्री. विलास सानप सहा. पोलीस आयुक्त मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि/संजय हजारे काशिमीरा पोस्टे, सपोनि/ महेंद्र भामरे, सपोनि/योगेश देशमुख, सपोनि/टिकाराम थाटकर व त्यांचे पथकाने केली आहे.

----ooo----